


Given at the hands of Padma Shri N. D. Mahanor, Marathi lyricist/poet. Received by Bhavarlal H. Jain



**यशवंतराव चव्हाण कृषि-औद्योगिक समाजरचना राज्यस्तरीय पारितोषिक २००६**

**माननीय श्री. भवरलाल हिरालाल जैन**

**सन्मानपत्र**

भारताच्या कृषि आणि ग्रामीण संस्कृतीच्या समृद्ध परंपरेचा वारसा घेऊन महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यातील वाकोद या छोट्याशा गावांत श्री. भवरलाल हिरालाल जैन यांचा जन्म दि. १२ डिसेंबर १९३७ रोजी झाला. त्यांच्या मातोश्री गौराबाई. प्राथमिक शिक्षण वाकोद येथे पार पडल्यानंतर पुढील शिक्षण त्यांनी जळगावला घेतले व त्यानंतर मुंबईला महाविद्यालयीन शिक्षण घेऊन ते व्यापार व कायदा या क्षेत्रातील पदवीधर झाले. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून त्यांची राजपत्रित अधिकारी पदासाठी निवडही झाली. परंतु नोकरीतील चाकोरीबद्ध जीवन न जगता काहीतरी वेगळे करायचे असे त्यांनी ठरवलं व मातोश्रींकडून रुपये सात हजारांचे भांडवल घेऊन ते व्यवसायात उतरले. रॉकेल विक्रीपासून सुरुवात करून क्रमाक्रमाने त्यांनी शेतीशी संबंधित अशा खते, बी बियाणे, जंतुनाशके व ट्रॅक्टर या वस्तुंच्या विक्रीच्या क्षेत्रात पदार्पण केले. व्यवसायांतील ही चढती कमान म्हणजे त्यांच्या व्यवहार व व्यापार कौशल्याचे गमक होते. आपल्या व्यवसायात स्थिरस्थावर झालेले असताना अचानकपणे एक दिवस त्यांच्या पेट्रोल पंपावर स्कॉटिश मिशनची रिंग डिझेल घेण्यासाठी आली. त्या रिंगवर लिहिले होते ॲग्रीकल्चर, ए प्रोफेशन विथ फ्यूचर. (शेती – एक उज्वल भवितव्य असलेला व्यवसाय) या संदेशातून त्यांना आपल्या पुढील कार्याची प्रेरणा मिळाली असे म्हणता येईल. शेती आणि शेतकरी यांच्या समृद्धीतूनच देशाच्या सर्वांगीण प्रगतीची वाटचाल करता येईल असा त्यांना मनोमनी विश्वास होता. त्या विश्वासाने त्यांनी कृषि-औद्योगिक विकासाच्या मार्गावर पुढील वाटचाल सुरू केली.

१९७८ साली केळ्यावर प्रक्रिया करण्याचा, एक आजारी कारखाना विकत घेऊन तिथे त्यांनी पपईच्या चिकापासून पपेन बनविण्यास सुरूवात केली. उत्कृष्ट दर्जाच्या उत्पन्नामुळे हा उद्योग आजही जगामध्ये गुणवत्तेत प्रथम स्थान टिकवून आहे. १९८० मध्ये त्यांनी पीव्हीसी पाईप करण्याचा कारखाना सुरू केला व त्यातूनच पुढे तुषार सिंचनपद्धत यासाठीचे पाईप आणि आवश्यक ते सर्व छोटे-मोठे भाग जोडलेली संपूर्ण यंत्रणा त्यांनी विकसित केली. पाणी म्हणजे शेतीचा प्राण आहे या जाणिवेतून पाण्याचा काटेकोरपणे वापर करून जास्तीत जास्त उत्पादन कसे घ्यावे यासाठी त्यांनी ठिबक सिंचनाच्या तंत्रज्ञानाचा जोमाने प्रसार केला व अन्य देशाला जलक्रांतीच्या उंबरठ्यावर नेले. आजमितीस देशात १० लाख हेक्टर्सपेक्षा जास्त क्षेत्र जैन ठिबक सिंचन प्रणालीच्या आधारे ओलिताखाली आलेले आहे. उपलब्ध पाण्याचा आवाका वाढविणारे हे तंत्रज्ञान म्हणजे महाराष्ट्रासारख्या अवर्षण प्रवण राज्याला मिळालेले वरदानच आहे.

त्यांनी विज्ञान व तंत्रज्ञानावर आधारित अत्याधुनिक प्रकल्प उभारून कृषि-औद्योगिक क्षेत्रातील पुढचे पाऊल टाकले. वेगवेगळ्या फळांवरील प्रक्रिया प्रकल्प, हरित व शीतगृहे, जैविकतंत्रज्ञान प्रयोगशाळा, शेती संशोधन आणि विकास केंद्र इत्यादी प्रकल्पांच्या माध्यमातून संपन्नतेकडे नेणारा राजमार्ग त्यांनी शेतकऱ्यांना खुला करून दिला. भारतीय शेतकऱ्यांना आत्मविश्वास आणि आशावाद यांचे बळ देतानाच आपल्या उद्योगांमध्ये जोपासलेल्या गुणवत्तेच्या व कार्यसंस्कृतीच्या आधाराने त्यांनी जागतिक बाजारपेठेत अग्रगण्य स्थान मिळविले.

कृषि-उद्योगातील नेत्रदीपक यशामुळे त्यांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले. त्यात फाय फाउंडेशन, जमनालाल बजाज, गांधी-आंबेडकर सामाजिक न्याय पुरस्कार हे त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे द्योतक आहेत. अमेरिकन इरिगेशन असोशिएशनतर्फे देण्यात आलेला 'क्रॉफर्ड रीड स्मृति पुरस्कारफ' त्यांच्या सिंचनक्षेत्रातील असाधारण कर्तृवाची साक्ष देणारा आहे. अनेक विद्यापीठांनी त्यांच्या तंत्रज्ञानातील व्यासंगाची व विचारप्रवर्तक साहित्याची दखल घेऊन त्यांना 'डॉक्टर ऑफ सायन्स' व 'डॉक्टर ऑफ लेटर्स' अशा पदव्या बहाल करून सन्मानित केले आहे. भारताची विकास व्यवस्था महानगरामध्ये किंवा राजकीय व प्रशासकीय केंद्रामध्ये अडकून राहू नये या उद्देशाने रोजगार पुरवणारे उत्पादक उद्योग ग्रामीण परिसरात उभारून त्यांनी विकासप्रक्रियेचा पाया विस्तारित केला. त्यांच्या सर्व उपक्रमात व्यावसायिकता, विज्ञान व तंत्रज्ञान, आर्थिक शिस्त आणि अपरिमित परिश्रम घेण्याची तयारी या गुणांचा संगम झाल्यामुळे सात हजार रुपयांच्या भांडवलावर सुरू झालेल्या छोट्या व्यवसायापासून जैन उद्योग समूहाचा व्याप हजार कोटी रुपयांच्या पुढे गेला आहे. 'इवलेसे रोप लावियले दारी, त्याचा वेलू गेला गगनावरी' हे ज्ञानेश्वरांचे बोल सार्थ ठरावेत अशीच श्री. भवरलालजींची यशोगाथा आहे. नियोजनपूर्वक परिश्रमातून प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यश मिळविण्याच्या त्यांच्या कार्यसंस्कृतीचे एक प्रतीक म्हणजे शिरसोली डोंगरमाळ या ओसाड टेकडीचे हिरव्यागार नंदनवनात केलेले रुपांतर. शेतीचा विकास हाच देशाच्या समृद्धीचा आधार होऊ शकतो या श्रद्धेतून त्यांनी उभारलेले सर्व उद्योग व उपक्रम, शेतीशी व शेतकऱ्यांशी निगडित आहेत.

आधुनिक महाराष्ट्राचे द्रष्टे शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाण यांनी कृषि-औद्योगिक समाजरचनेवर आधारित विकासाचे ध्येय जनतेसमोर ठेवले होते व त्यांचा सामान्य शेतकऱ्यांच्या सुजाण प्रयोगशीलतेवर दृढविश्वास होता. त्यांचा हा विश्वास सार्थ ठरविणाऱ्या श्री. भवरलाल हिरालाल जैन यांना यशवंतराव चव्हाण कृषि-औद्योगिक समाजरचना पारितोषिक २००६ आज दिनांक २५ नोव्हेंबर २००६ रोजी मा. यशवंतरावांच्या पुण्यस्मृतिदिनी प्रदान करताना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईला विशेष आनंद होत आहे.

मुंबई
दिनांक : २५ नोव्हेंबर २००६

**शरद पवार**
*अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई*